

सत्यमेव जयते

**राजेंद्र दर्डा**

**मंत्री, शालेय शिक्षण**
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
www.maharashtra.gov.in

## संदेश

राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गुणवत्तापूर्ण होण्यासाठी माझे सर्व सहकारी सतत प्रयत्नशील आहेत. शैक्षणिक विकासासाठी आमच्या विभागातर्फे सन २००० पासुन सर्व शिक्षा अभियान राबवून ते यशस्वी केले. आता माध्यमिक स्तरासाठी राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत सन २००९-१० पासून मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याकरिता प्रशिक्षण सुरु केलेले आहे. सदरचे प्रशिक्षण कार्यक्रम राज्याची शिखर प्रशिक्षण संस्था 'यशदा' मार्फत आयोजित केले जात आहेत. हे प्रशिक्षण कार्यक्रम अधिक प्रभावी होण्यासाठी तसेच प्रशिक्षणानंतरही प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शनासाठी 'उत्कर्ष' ही वेबसाईट सुरु करण्यात येत आहे.

या निमित्ताने मी आपल्याला आवाहन करतो की, या वेबसाईटवर देण्यात आलेली माहिती शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी उपयुक्त ठरणार आहे. तेव्हा याचा जास्तीत जास्त वापर करावा. या उपक्रमास माझ्यातर्फे हार्दिक शुभेच्छा!

(राजेंद्र दर्डा)

**कार्यालय :** दालन क्र. ४३० (मुख्य), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. **दूरध्वनी :** २२०२ ४१५४,२२०२ ५६८८, **फॅक्स :** २२०२ ५१४८.
**निवास :** 'नंदनवन', मलबार हिल, मुंबई-४०० ००६. **दूरध्वनी :** २३६३ ०२८६, **फॅक्स :** २३६८ २०२०.